जाहिर निवेदन

मा. अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, शासकीय कृषि महाविद्यालय, पुणे येथील थारपारकर, गीर, राठी व लालसिंधी या अनुत्पादित गायींची विक्री जाहिर लिलाव पद्धतीने दि- १२/१०/२०२६ रोजी आयोजित केलेली आहे. तरी ज्या शेतक-यांना गायी खरेदी करावयाची आहेत त्यांनी लिलावाच्या दिवशी सकाळी १०.०० वा हजर राहावे. लिलावात भाग घेणाऱ्या शेतकरी/पशुपालक यांनी आपण शेतकरी असले बाबतच्या पुराव्यासाठी चालू जमिनीचा ७/१२ उतारा सोबत घेऊन यावे.

प्रत्यक्षात लिलावात भाग घेताना अनामत म्हणून रक्कम रु-२०००/- भरावी लागेल. लिलाव संपल्यानंतर ज्या शेतक-यांनी गायी खरेदी केली नाहीत त्यांची अनामत रक्कम त्याच दिवशी परत केली जाईल.

लिलावामध्ये विक्री जाणारी गाई व लिलावाच्या अटी डेअरी प्रक्षेत्रावर लिलावाच्या तारखेपर्यंत प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी सकाळी ९.०० ते ४.३० या वेळेत ठेवण्यात येतील.

गायी खरेदी केल्यानंतर त्याच दिवशी खरेदीदाराने खरेदीची रक्कम जमा करून गायी चार दिवसांच्या आत घेऊन जावयाचे आहे.

प्रमुख शास्त्रज्ञ,
मा. अजितदादा पवार देशी गाय संशोधन व
प्रशिक्षण केंद्र, कृ.म.वि., पुणे.

संपर्क क्र. श्रीमती पिंपरकर ७५८८४२९२९८, श्री. सांगळे ९०९६६६४६२३

जा.क्र./अपदेगासंप्र/गा.वि.लि./ ५२४/२०२६
दिनांक- ३०/०९/२०२६

प्रत
१. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, बारामती/जुन्नर/खेड/ मार्केट यार्ड गुलटेकडी .
२. मा. अध्यक्ष, गो-सेवा आयोग, महाराष्ट्र शासन.
३. सर्व नोटीस बोर्ड, कृ.म.वि., पुणे.